## नि.२६९ वरील आदेश

१.        प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज जादा मुद्दे निघण्याकरीता दाखल केले आहे. सदरकामी यातील वादीने प्रतिवादीविरुध्द खरेदीचा व्यवहार रद्द होऊन मिळणेबाबत व दावा मिळकतीची वादीची मालकी हक्काची जाहीर असलेबाबत व कब्जेवहीवाटीबाबतचा दावा केला आहे. सदर दावेस प्रतिवादीने नि.४६ व १२९ ला कैफियत दिलेली आहे. त्या कैफियत कलम १३ मध्ये वादी नं.१ चे वडील शर्फुद्दीन यांनी ज्यावेळी प्रतिवादी नं.१ चे विरुध्द व विलास शिंदे या दोघाविरुध्द रे.दि.मु.नं. २६/१९९६ चा दावा केला. त्यावेळी अब्दुल हसन संदे हयात होते. तसेच त्या दावेतील मिळकत व हल्लीच्या दावेतील मिळकत एकच आहे. दोन्ही दाव्याची रचना एकच फॅक्टवर आधारलेली आहे. त्यामुळे पुर्वीचा दावा काढुन टाकलेमुळे आता हा दुसरा केलेला दावा कायद्यामुळे चालु शकत नाही. तो रद्द होणेस पात्र आहे असा मजकुर नमुद आहे. परंतु याप्रमाणे मुद्दा याकामी निघालेला दिसत नाही. त्यामुळे सदरकामी खालीलप्रमाणे मुद्दा काढण्यात यावा.

Whether the suit is barred by C.P.C. order 2 Rule 2?

Whether the suit is in limitation?

अशा प्रकारचे मुद्दे निघणे योग्य व न्यायाचे होणार आहे. सदरचे मुद्दे न निघालेस या प्रतिवादीचे कधीही भरुन न येणारे कायमचे नुकसान होणार आहे. तरी वरीलप्रमाणे मुद्दे काढण्याची विनंती केली.

२.		प्रतिवादीच्या सदर अर्जास वादी यांनी नि.२७१ वर आपले म्हणणे दाखल केले. त्यांच्या मते प्रतिवादीचा नि.२६९ चा अर्ज व त्यामधील मजकुर वादीस मान्य नाही व कबुल नाही. दावा barred होत असलेबाबतचा प्रतिवादींनी सुचविलेल्या मुद्याबाबत कोणतेही स्पष्ट कथन प्रतिवादीचे नि.४६ चे कैफियतीमध्ये नाही. त्यामुळे तो मुद्दा काढता येत नाही. तसेच सदरकामी वादीतर्फे तोंडी पुरावा संपलेला आहे आणि तशी पुरसिससुध्दा वादीने दिलेली आहे. वादीचे तोंडी पुरावे संपलेनंतर प्रतिवादीचे सुचविलेले दोन्ही मुद्दे Fact in issue अशा स्वरुपाचे आहेत. सदरच्या सुचविलेल्या मुद्यामध्ये Fact चा विचार न करताच सुचविलेले मुद्दे काढण्यात आलेस वादीवर अन्याय होणार आहे. तसेच सदरच्या सुचविलेल्या मुद्यांबाबत वादीला पुन्हा दावा दुरुस्ती करावी लागणार आहे व जादा तोंडी पुरावा द्यावे लागणार आहेत.

३.		तसेच सदरील सुचविलेल्या दोन्ही मुद्याबाबतची स्पष्ट माहिती प्रतिवादीस प्रथमपासुनच असतानासुध्दा दावा चौकशीस लागणेपुर्वी प्रतिवादींनी दिवाणी न्यायप्रक्रिया संहिता मधील तरतुदीप्रमाणे Proposed issue मे. कोर्ट मजकुरी दिलेले नव्हते व नाहीत आणि वादीचा तोंडी पुरावा संपलेनंतर मुद्दामहुन व जाणीवपुर्वक सदरचे दाव्याचे चौकशीचे काम लांबविणेचे दृष्टीने सदरचा additional issues चा अर्ज लबाडीने केलेला आहे. सबब तो रद्द व्हावा अशी विनंती केली.

४.		वादी व प्रतिवादी यांचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी यांनी त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये अशी तक्रार घेतली की,

वादी नं.१ चे वडील यांनी पुर्वी आटपाडी कोर्टामध्ये रे.दि.मु.नं.२६/१९९६ यातील प्रतिवादी नं.१ व विलास शिंदे यांचेविरुध्द दाखल केला होता. सदरचा दावा मे. कोर्टाने दि.१३/०२/२००२ रोजी काढुन टाकला आहे. अशा परिस्थितीत हल्लीच्या वादींना सदरचा दावा कायद्याने करता येत नाही व तो रद्द होण्यास पात्र आहे. तसेच प्रतिवादीने त्यांच्या लेखी कैफियतच्या परिच्छेद क्र.४ मध्ये तक्रार घेतली की, सन १९९६ चे खरेदीपत्र या दाव्यात रद्द करुन मागितले आहे. सदर प्रतिवादी नं.१ ने घेतलेले खरेदीपत्र दि.१९/०२/१९९६ चे असुन त्यास दि.१९/०२/२००८ रोजी बारा वर्षे पुर्ण झालेली आहेत. त्यामुळे खरेदीपत्राविषयीची दाद मुदतीत नाही.

५.　　　　वादी व प्रतिवादी यांच्या दावा व कैफियतनुसार माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी नि.१०६ नुसार वादमुद्दे काढलेले आहेत. प्रतिवादीने त्याच्या लेखी कैफियतीमध्ये घेतलेल्या तक्रारीचे अवलोकन केले असता वादीच्या वडीलांनी पुर्वी याप्रकारचा दावा या न्यायालयात दाखल केला होता व तो दावा न्यायालयाने काढुन टाकला होता. न्यायालयाने दावा काढुन टाकल्यानंतर परत दाखल केलेल्या दाव्यास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २ नियम २ ची बाधा येत नाही. त्यामुळे सदरचा मुद्दा याठिकाणी निघु शकत नाही. प्रतिवादी यांनी त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये वादीने खरेदीपत्र रद्द करुन मागितलेची दाद हि मुदतीत नाही असा बचाव घेतलेला आहे, परंतु तसा मुद्दा निघणे आवश्यक आहे.

६.　　　　नि.१०६ वरील मुद्यांचे अवलोकन केले असता मुदतीचा मुद्दा

याठिकाणी काढण्यात आलेला नाही. त्यामुळे तसा वादमुद्दा निघणे आवश्यक आहे. सबब प्रतिवादी यांचा अर्ज अंशतः मंजुर होण्यास पात्र ठरतो. करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादीचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीच्या अर्जात नमुद वादीच्या दाव्यास मुदतीच्या कायद्याची बाधा येते काय? असा मुद्दा काढण्यात यावा.

३. खर्चाबाबत काही आदेश नाहीत.

**Sd/-**

**( अनंत रा. टेंगसे )**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.,

आटपाडी.

आटपाडी.

दिनांक १७/०२/२०२४.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - A. A. Jamadar
Court - Jt. CJJD and JMFC, Atpadi.
Date - 17.02.2024
Order signed by the
Presiding Officer on - 17.02.2024
Order uploaded on - 17.02.2024